म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २७५५

# आतां वन्दूं कवेश्वर



REFBK-0023557
REFBK-0023557

नस्ता कवींचा व्यपार। तरी कैंचा अस्ता जगोद्धार।
म्हणोनि कवी हे आधार। विश्वजनांसी ।।

# आतां वन्दूं कवेश्वर

संपादक : **अमरेंद्र गाडगीळ**
सहाय्यक : **डॉ. वि. म. कुलकर्णी**

REFBK-0023557
REFBK-0023557

समर्थ रामदास संशोधन प्रबोधन संस्था पुरस्कृत
श्री शिवसमर्थ त्रिशताब्दी महोत्सव मध्यवर्ती समिति पुणे



श्री शिव-समर्थ त्रिशताब्दी प्रकाशन
श्री शिव-समर्थ त्रिशताब्दी महोत्सव मध्यवर्ती समिती पुणे-उपक्रम

**प्रकाशक**

अ. ल. गाडगीळ, कार्यवाह, समर्थ रामदास संशोधन प्रबोधन सस्था
११९४, सदाशिव पेठ, पावन मारुति चौक, पुणे ४११ ०३० (महाराष्ट्र)

**मुद्रक**

'प्रतिबिंब' २८१, शिवाजीनगर पुणे ४११ ००५

आवृत्ती पहिली : शके १९०३; सन १९८२ : मूल्य आठ रुपये

## समर्पण

महाराष्ट्र संतकविपंचकात वैशिष्टयपूर्ण स्थान लाभलेले कविश्रेष्ठ श्रीसमर्थ रामदासस्वामी यांच्या निर्याणत्रिशताब्दीचे हे वर्ष. त्यानिमित्त मराठी कवी या नात्याने महाराष्ट्रातील ख्यातनाम कवींनी समर्थांना आपापले भाव-काव्यपुष्प एकत्रित समर्पण करावे, अशी कल्पना मनात आली. त्याप्रमाणे त्या त्या कविवर्यांना पत्रे लिहून कविता पाठविण्याविषयी विनंती केली. अगदी थोडे अपवाद वगळता बाकी सर्वांनीच संस्था-समितीची ही विनंती मान्य करून आपापल्या कविता अत्यादराने पाठविल्या. या सर्व कविता नवीन आहेत; केवळ कै. कुंजविहारींच्या कवितेचे पुनर्मुद्रण आहे; तसेच ज्यांनी समर्थांवर पूर्वीच काव्यसंग्रह केले आहेत, अशांपैकी काहींच्या कविता पुन्हा यात घेतल्या आहेत.

दुसऱ्या भागात, आम्ही प्रगट आवाहन समर्थ-विषयक कविता पाठविण्यासाठी केले होते त्यांतील निवडक कविता आहेत; आणि तिसऱ्या भागात भारतीय कविश्रेष्ठ रवींद्रनाथ ठाकूर यांच्या मूळ बंगाली भाषेतील शिव-समर्थविषयक ऐतिहासिक 'प्रतिनिधी' या काव्याचा समावेश केला आहे. त्याचा मराठी अनुवाद श्री. श्रीपाद जोशी यांचा आहे.

या काव्यसंग्रहाला 'आतां वंदूं कवेश्वर' हे नाव संग्रहाची कल्पना मनात आली त्या वेळीच निश्चित झाले. कै. शंकर श्रीकृष्ण देव-संपादित डोमगाव पाठाप्रमाणे 'दासबोधा'तील हे मूळ शब्द आहेत. (दास.१. ७. १.)

प्रगट आवाहनानुसार आलेल्या असंख्य कवितांतून निवड व त्यांचे संपादन करण्याची कामगिरी आमचे स्नेही सत्वागळे डॉ. वि. म. कुलकर्णी यांनी आमचेसाठी केले. आम्ही या सर्वांचे अंतःकरणपूर्वक कृतज्ञ आहोत. या सर्वांच्या निरपेक्ष सहकार्यामुळेच समर्थविषयक हा वैशिष्टयपूर्ण काव्यसंग्रह समर्थभक्तांच्या आणि काव्यरसिकांच्या हाती देता आला. त्या सर्वांना समर्थांचे कृपाशीर्वाद लाभोत, ही प्रार्थना.

महाराष्ट्र-कविमंडळासमवेत कविश्रेष्ठ श्रीसमर्थ रामदासचरणी ही भाव-कविता-सुमनांजली सादर समर्पीत असो.

---

कार्यवाह, समर्थ रामदास संशोधन प्रबोधन संस्था; श्रीशिव-समर्थ त्रिशताब्दी महोत्सव समिती, पुणे.

आतां वंदूं कवेश्वर । शब्दसृष्टीचे ईश्वर ।
नातरी हे परमेश्वर । वेदावतारी ।। दास. १.७.१ ।।
नाना साधनांचें मूळ । कवि नाना प्रेत्नांचें फळ ।
नाना कार्यसिद्धी केवळ । कविचेनि प्रसादें ।। १४ ।।
नस्ता कवीचा व्यापार । तरी कैंचा अस्ता जगोद्धार ।
ह्मणौनि कवि हे आधार । सकळ सृष्टीसी ।। २१ ।।
ऐसे पूर्वीं थोर थोर । जाले कवेश्वर अपार ।
आतां आहेत पुढें होणार । नमन त्यांसी ।। २५ ।।
नाना चातुर्याच्या मूर्ती । कीं हे साक्षात् बृहस्पती ।
वेद श्रुती बोलों ह्मणती । ज्यांच्या मुखें ।। २६ ।।
कीं हा ईश्वराचा पवाड । पाहातां गगनाहून वाड ।
ब्रह्मांडरचनेहून जाड । कविप्रबंदरचना ।। ३३ ।।
आतां असो हा विचार । जगास आधार कवेश्वर ।
तयांसी माझा नमस्कार । साष्टांग भावें ।। ३४ ।।
देवाचेन प्रसन्नपणें । जें जें घडे बोलणें ।
तें तें अत्यंत श्लाघ्यवाणें । या नाव प्रसादिक ।। दास १४.३.६ ।।
धीट म्हणिजे धीटपणें केलें । जें जें आपुल्या मनास आलें ।
बळेंचि कवित्व रचिलें । या नाव धीट बोलिजे ।। ८ ।।
पाठ म्हणिजे पाठांतर । बहुत पाहिलें ग्रंथांतर ।
तयासारिखा उतार । आपणही केला ।। ९ ।।
सीघ्रचि कवित्व जोडिलें । दृष्टी पडिलें तेंचि वर्णिलें ।
भक्तिवांचून जें केलें । त्या नांव धीट पाठ ।। १० ।।
कवित्व नसावें धीटपाठ । कवित्व नसावें खटपट ।
कवित्व नसावें उद्धट । पाषांडमत ।। १४ ।।
जया अंतरीं भगवंत । अचल राहिला निवांत ।
तो स्वभावें जें बोलत । तें ब्रह्मनिरुपण ।। २५ ।।
त्याचे भक्तीचें कौतुक । तया नाव प्रसादिक ।
सहज बोलतां विवेक । प्रगट होय ।। ३४ ।।
जेणें अनुताप उपजे । जेणें लोकिक लाजे ।
जेणें ज्ञान उमजे । या नाव कवित्व ।। ४८ ।।
जेणें सद्बुद्धि लागे । जेणें पाषांड भंगे ।
जेणें विवेक जागे । या नाव कवित्व ।। ५१ ।।

# आतां वंदूं कवेश्वर

श्रीसमर्थ रामदासांचे सारेच कर्तुत्व अगाध आहे. त्यांनी आपले जीवन तपश्चर्येने सार्थकी लावले व इतरांना जीवन सार्थकी लावण्याचा सन्मार्ग दाखवून दिला. ते खरे 'कर्मयोगी संत' होते. राष्ट्रसंत होते. "हें प्रचीतीचें बोलिलें। आधीं केलें मग सांगितलें। मानेल तरी पाहिजे घेतलें। कोणी एकें॥" असे त्यांचेच वचन आहे !

प्राचीन मराठी साहित्यात स्वतःचे जवळजवळ स्वतंत्र काव्यशास्त्र निर्माण करून ठेवणारे रामदास हे एक असामान्य **संतकवी** होत.

कवित्व कसे असावे, कसे नसावे याबद्दलच्या त्यांच्या कल्पना स्वतंत्र व स्पष्ट होत्या. ते जीवन आणि साहित्य व प्रपंच आणि परमार्थ याची सांगड घालणारे महापुरुष होते. नुसत्या पारलौकिकाचे स्तोम न माजविता, ऐहिक व पारलौकिक या दोहोंचा समन्वय त्यांनी आपल्या जीवनकार्यात व साहित्यात सुंदर रीतीने साधला.

समाजाला वळण लावण्याचे, समकालीन समाजाचे अंतर्बाह्य उद्बोधन करण्याचे काव्य हे एक प्रभावी माध्यम आहे ही रामदासांची यथार्थ कल्पना होती. काव्याच्या अंगभूत सामर्थ्याचा आणि प्रभावाचा उच्च जयजयकार त्यांनी अनेक ठिकाणी केला आहे. आजच्या समीक्षेच्या भाषेत बोलायचे तर "समाजाची यथायोग्य बांधिलकी" मानणारे ते कवी होते.

समर्थ आपल्या काव्यरचनेत नाना प्रकारचे भाव वर्णन करतात. निसर्गाचे चित्र उभे करतात. प्रभूच्या सृष्टिरचनेचा गौरव करतात. आत्मचरित्रपर आत्मप्रत्ययाचे उत्कट बोलणे बोलून ठेवतात. देवाचे व सत्त्वगुणाचे असंख्य वेळा गायन करतात. भक्ती व करुणा आणि धैर्य व उपासना यांनी त्यांचे दैवी काव्य विनटलेले आहे. "तैसें ज्ञानें तृप्त व्हावें। तेंचि ज्ञान जनास सांगावें। तरतेन बुडों नेदावें। बुडतयासी॥" अशी त्यांची भूमिका होती, शिकवण होती.

कवित्वाने परमार्थ तर साधावाच पण कवित्व हे विवेक जागविणारे आणि प्रपंचाचेही सारथ्य करणारे असावे ही रामदासांची कल्पना, त्या काळच्या पार्श्वभूमीवर अभिनव व अस्मिता जागृत करणारी अशी होती.

कवित्वावर पुष्पहाराचे एक सुंदर रूपक समर्थांनी केले आहे. ते म्हणतात :

कवित्व शब्दसुमनमाळा। अर्थ परिमळ आगळा।
जेणे संतषट्पद कुळा। आनंद होये॥
ऐशी माळा अंतःकरणीं। गुंफून पूजा रामचरणीं।
ओंकार तंत अखंडपणीं। खंडूंचि नये॥

ॐकाराचे म्हणजे परब्रह्माचे सूत्र सुटू देऊ नये, आगळा असर्थघन सुगंध असावा आणि अशी शब्दसुमनांची माळा गुंफून ती प्रभुचरणी वाहावी – अशी उदात्त धारणा कवित्वाबद्दलची समर्थांची आहे. "वाचें बरवें कवित्व। कवित्वीं बरवें रसिकत्व । रसिकत्वीं परतत्त्व। स्पर्शु जैसा ।।" या श्रीज्ञानेश्वरमाउलींच्या कल्पनेशी मिळतीजुळती अशीच ही कवित्वाच्या रूपाबद्दलची आणि प्रयोजनाबद्दलची कल्पना नाही काय ?

संस्कृत साहित्यशास्त्र कित्येक शतके परंपरेने चालत आलेलेच होते. रस, रीती, गुण, अलंकार यासंबंधीचे ते विवेचन सर्वप्रसिद्धच आहे. संस्कृत साहित्यशास्त्राला थोडे वेगळे वळण देत मराठी संतकवींनी आपले साहित्यशास्त्र शांतरसाच्या, भक्तिरसाच्या वाटेने अधिक नेले आहे. ध्वन्यर्थावर आणि शृंगारिक उदाहरणांवरच फार भर देत ते बसले नाहीत··· त्यांना समाजप्रबोधनही करावयाचे होते. "बुडती हे जन न देखवे डोळा । येतो कळवळा म्हणवोनी" अशी त्यांची दैवी करुणा होती. प्रेरणा होती. "सामाजिक बांधिलकी" म्हणजे अंतःकरणातील सहानुभूतीने जनमानसाच्या सुखदुःखाशी समरस होणे ··· तेच संतांनी आपल्या रीतीने केले. रसपरिपोषापेक्षा सामर्थ्य, विवेक आणि ज्ञान व समता यांची ज्योत जागविण्याकडे संतांचे अधिक लक्ष दिसते. "संस्कृत वाणी देवें केली। प्राकृत काय चोरापासोनि झाली ?" असे एखादे नाथ महाराज उच्चारतात तेव्हा मायमराठीचा अभिमान बाळगणाऱ्या ज्ञानेश्वरांपासून तुकाराम महाराजांपर्यंतच्या सर्वांच्या मनातलेच ते बोलतात यात शंका नाही.

श्रीसमर्थांनी कवींच्या तीन श्रेणी कल्पिल्या होत्या. धीट, पाठ आणि प्रासादिक.

मनास येईल त्या विषयावर ओढून ताणून शब्द जुळविणारा तो धीट कवी. इतरांचे वाचून त्याप्रमाणे स्वतः ट ला ट जोडणारा तो पाठ (व भक्तिहीन व शृंगारिकच लिहीत बसणारा तो धीटपाठ) आणि निर्मळ, सरळ, प्रांजळ, भक्तियुक्त जे काव्य ते प्रासादिक. प्रसाद म्हणजे ईश्वरी प्रसाद, त्याने युक्त जे ते प्रासादिक. ते प्रसन्न असते, उदात्त असते. मानवाला साधुत्वाकडे घेऊन जाते···

प्रासादिक कवींच्या योग्यतेची, कवीश्वरांची महती गाताना रामदास रंगून गेले आहेत. "ते अमृताचे मेघ आहेत. विवेकनिधीचे भांडार आहेत. ते सुखाचे तारू आहेत." असे रामदास परोपरीने त्यांचे श्रेष्ठत्व वर्णितात. अशा पदवीचे कवी हे "ज्ञानाची योग्यता, सामर्थ्यवंतांची सत्ता आणि महापुरुषांची महत्ता" जगाला पटवून देतात हे समर्थांनी आवर्जून व मोठ्या आत्मप्रत्ययाने, आत्मविश्वासाने सांगितले :

नसता कवीचा व्यापार । तरी कैंचा अस्ता जगोद्धार ।
म्हणौनि कवि हे आधार । सकळ सृष्टीशी ।।

असे कवीश्वरांचे महिमान समर्थांनी गायिले आहे, ते सार्थच आहे.

समर्थांचे सारे काव्य व्यक्तिवैशिष्टयाने भारलेले आहे. मरगळलेल्या व परसत्तेच्या दडपणाखाली सापडलेल्या मराठी समाजाला चैतन्य प्राप्त करून देण्याचे सामर्थ्य या काव्यात ठायी ठायी खचितच आढळते. समर्थांनी प्रतिपादन केलेले काव्याचे निकष त्यांच्या स्वतःच्या रचनेला लावून पाहिले तरी ते किती तेजस्वी, मनस्वी व आशावादी आहे याची कल्पना येते. समर्थांचे एकेक वचन, एकेक ओवी म्हणजे विचारसौंदर्य व श्रेष्ठ जीवनमूल्यांचे संकीर्तन यांचा अमोलिक संगम आहे.

यत्न, धैर्य, साक्षेप, विवेक, सामर्थ्याची उपासना आणि अखंड सावधपणा यांचा समन्वय साधणारे—प्रापंचिक व पारमार्थिक या दोघांनाही सारखेच उपकारक असणारे असे या स्वरूपाचे काव्य जगाच्या वाङमयातही थोडेच सापडेल.

मराठी साहित्यक्षेत्रातील नामवंत, प्रतिभावंत 'ईश्वराचे देणे' लाभलेल्या कविवर्यांची समर्थसंबंधीची सद्भावना विविध काव्यरचनांतून येथे सादर केली आहे. या पिढीच्या प्रतिभावंतांनी पूर्वीलांचा केलेला हा गौरव आत्मानंद वाढविणारा व मराठी कविपरंपरेचा दीपस्तंभ उजळणारा आहे असेच कोणीही म्हणेल.

आमच्या आवाहनास मान देऊन, महाराष्ट्राच्या विविध प्रांतांतून कविमित्रमंडळींनी आपली सुगंधित वाक्सुमने आम्हांकडे प्रेमाने व सद्भावाने धाडली. ती सारीच भक्तिभावप्रेरित आहेत. ग्रंथाच्या पृष्ठमर्यादेत व संकल्पनेत त्यांतील जेवढी समाविष्ट करता आली तेवढी आदरपूर्वक संकलित केली आहेत.

स्वतंत्र प्रज्ञेच्या व स्वयंभू प्रतिभेच्या या 'सज्जनगड' च्या थोर संताचे सम्यक्दर्शन व गुणगायन **'आतां वंदू कवेश्वर'** या नामोच्चाराने आम्ही सादर केले आहे. महाराष्ट्रधर्माचा संदेश मायमराठी अमृतबोलांतून आळविणाऱ्या **समर्थांचा व सर्व थोर साधु-संतांचा** ऋणभार माथी घेऊनच आम्ही ही वंदनगाथा मराठी रसिकांच्या हाती सुपूर्द करीत आहो. ती त्यांच्या मनबुद्धीस चैतन्य देत राहो हीच प्रार्थना.

उत्कट भव्य तेंचि घ्यावें । मळमिळत अवघेंचि टाकावें ।
निःस्पृहपणें विख्यात व्हावें । भूमंडळीं ।। ... ...
शरीर परोपकारी लावावें । बहुतांच्या कार्यास यावें ।
उणें पडों नेदावें । कोणी एकाचें ।। ... ...
अरे या संतांचा महिमा । बोलावया नाहीं सीमा ।
जयांचेनि जगदात्मा । अंतरचि होय ।। ... ...

ही समर्थांची शिकवण स्मरणात ठेवावी व करुणा, कर्तृत्व आणि कीर्ती यांची बळकट कास धरावी हेच बरे !

| | | | |
|---|---|---|---|
| १ | समर्थांचा साहित्यिकांस संदेश | यशवंत | १ |
| २ | रामदास | अज्ञातवासी | २ |
| ३ | समर्थ | अनिल | ३ |
| ४ | दास डोंगरी राहतो | बा. भ. बोरकर | ४ |
| ५ | स्तवन | गोपीनाथ तळवलकर | ५ |
| ६ | समर्थ-रामदास | सोपानदेव चौधरी | ६ |
| ७ | श्री समर्थांस | वा. रा. कान्त | ७ |
| ८ | महाराष्ट्र-मंदिरी | 'सुधांशु' (औदुंबर) | ८ |
| ९ | सद्गुरूंचे दर्शन | वि. म. कुलकर्णी | ९ |
| १० | मज रघुनाथजी वेगळें…नाहीच ! | कृ. ब. निकुम्ब | १० |
| ११ | करुणाष्टके | गंगाधर महाम्बरे | १२ |
| १२ | नशिबाचा खेळ | योगेश्वर अभ्यंकर | १३ |
| १३ | कविवरा | मोरेश्वर पटवर्धन | १४ |
| १४ | अक्षरपूजित कवीश तू ! | गं. रा. पाठक | १५ |
| १५ | कृतार्थ जीवनगान | कल्याण इनामदार | १६ |
| १६ | आग वणवा पेटला ! | न. म. जोशी | १७ |
| १७ | अंगाई पाळणा गाते | गोविंदस्वामी आफळे | १८ |
| १८ | आरती | इंदिरा संत | २० |
| १९ | समर्था, घे अवतारा | पद्मावती गोळे | २२ |
| २० | समर्था ! जन्मा या हो पुन्हा ! | संजीवनी मराठे | २३ |
| २१ | पुण्यश्लोक समर्थ ! | योगिनी जोगळेकर | २४ |
| २२ | नमस्कार माझा तुम्हा श्रीसमर्था | शांता ज. शेळके | २५ |
| २३ | सज्जनगड | (कै.) कुंजविहारी | २८ |
| २४ | जाहले पावन कुबडीतीर्थ | बबनराव नावडीकर | ३० |
| २५ | सावधान | श्रीराम बा. आठवले | ३१ |
| २६ | त्यांना कोटि कोटि प्रणाम | 'श्रीधरदास' | ३२ |
| २७ | समर्थ जीवन तुझे समर्था ! | जयंत भिडे | ३३ |
| २८ | श्रीसद्गुरु समर्थ | नाना देवधर | ३४ |

# समर्थांचा साहित्यिकांस संदेश

'महाराष्ट्र'कवी यशवंत

ल्याहावे शुद्ध वाचावे — जाणावे तदनंतरे
जाणता कळता बिंबे — बिंबता स्फूर्ति होतसे
आपुल्या शिष्यवृंदाला — बोधिले यापरी जरी
बोध साहित्यिकां साऱ्या — शिरोधार्य खरोखरी
रुजले भिजले चित्ती — कोंभ तो फुटतो तया
न्याय साहित्यिकांच्या या — मान्य होतोच वाङ्मया
अंतरी बिंबले नाही — त्यातले बोल कोरडे
रचल्या घातले मोले — तयांचे शुष्क ते रडे
अस्वस्थ होउनी चित्त — स्रवते वैखरी जरी
ठाव घेईल ती जाणा — सर्वत्र जनान्तरी
पढविले जेव्हढे काही — बोलतो शब्द पोपट
आत्म्यास झोंबले त्याचे — स्फूर्त साहित्य उत्कट
कळा ज्या लागल्या जीवा — मना ज्या छळती व्यथा
त्यांतुनी निर्मिती होते — म्हणा 'कादंबरी' 'कथा'
करा सालंकृता तीते — आपुल्या ऐपतीपरी
परंतू नकली काही — पारखी घेइ का करी
संदेश स्वाक्षरीसाठी — जे कोणी घेरिती अम्हा
समर्था! त्याजला देतो — आपुला मंत्र हा महा
'ल्याहावे, शुद्ध वाचावे — जाणावे तदनंतरे
जाणता कळता बिंबे — बिंबता स्फूर्ति होतसे'

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2755
दा. क्र. 234547
काव्य 25|9|82
ग्रंथ शाखा (स्थल प्रत)

## रामदास

### अज्ञातवासी

तारांगण टेकले ज्यावरी
तो हा दिसतो उभा रायगड
शिवरायावर छत्र हा धरी
अभेद्य आणिक गडांत अवघड ॥ १ ॥

असंख्य गड ह्या सह्याद्रीवर
छत्रपतीची सत्ता त्यावर
सज्जनगडची भगवी छाटी
उभवित हिंदी राज्य मराठी ॥ २ ॥

वाहे इथुनी स्फूर्ति खळाळा
रामदास तर संत आगळा
आणि लिहाया आहे बसला
अपूर्व काही दिसे तयाला ॥ ३ ॥

कणकण इथल्या मातीमधला
सर्व दिशांना दिसे विखुरला
प्यार रायगड शिवप्रभूला
सज्जनगड आणि रायगडाला ॥ ४ ॥

# समर्थ

अनिल

समर्थांचे सेवक सत्य आम्ही निक्षून राहिलो नाही
वक्र पाहू धजतात आता आमच्याकडे कोणीही

सामर्थ्यच दिसले नाही तर कुणास आमचा वाटेल धाक
संकट चाल करून येता कोण ऐकेल आमची हाक

आपण शांती जपणारांची दुर्बळ शांती असते व्यर्थ
दुसऱ्यास शांत करून सोडील त्याच शांतीत काही अर्थ

संपन्नतेचे गौरवाचे स्वत्वनिर्भर समाधान
टिकवून ठेवण्यास आहोत काय आम्ही अखंड सावधान

मनात आहे दास्य दडून असा त्याचा लागता शोध
जागृत करतात रामदास आणि समर्थ दासबोध !

## समर्थ रामदास

सोपानदेव चौधरी

(मुक्त काव्य)

सांगितलेले सांगो नये,
असे सांगणारे रामभक्त
स्वयंसिद्ध तपस्वी–
त्या ‘शुभमंगल सावधानीं’,
बद्ध न होता–
सर्वामुखीं मंगलाचे–
अवधान देउनी–
सिद्ध झाले !
चिंता करितो विश्वाची
लोककल्याणास्तव
विश्वरूप झाले !
..................................
तो दाशरथी, श्रीराम–
मना सज्जना– मनोरथीच्या
आंतरिक आत्मारामाला
प्रकर्षेण साद देत आहे
तोच सुहावा प्रसाद !
नराने करणी केली तर–
नराचा नारायण होतो.
परंतु इथे तर– तो
नराचा नारायण होऊनच
पाळण्यात खेळला !
आणि मग नारायणाने
समर्थ-पद प्राप्त केले.
ही सर्वोच्च तिसरी पायरी !
– जय जय रघुवीर समर्थ !

# श्री समर्थास

वा. रा. कान्त

देखिले समर्था, तुमचे जन्मस्थान
घन जांब, राघुचे पाचूचे उड्डाण
अन् जीर्ण त्यात घर तुमचे, धूळ उसासे
अर्धा मनाचा श्लोकच दुसरा खिन्न !

शिव-चिता-भस्मिचे प्रलयभाव लेऊन
फूत्कार फणींचे डमरू ध्वनि घेऊन
शब्दांत उसळले ते गोदाजल तेव्हा
उसंळु द्या शब्द ते आता गोदेतून

तुम्ही घार उठविली कथा ऐकिली कानी
परि गरुड मराठी आज पंखहत भुवनी
उडवता कधी ‘ संपाति ’ दग्ध हा गगनीं

आज विचारिशि इथे उभा राहून
का पद्मपत्रि तुम्हि सडता बद्ध बनून
क्रंदता कशाला अंध चक्रवाकांनो,
मार्तंड जागवा तुम्हीच तिमिरातून !

# महाराष्ट्र-मंदिरी

सुधांशु (औदुंबर)

महाराष्ट्र-मंदिरी
दिशा दिशांतुन अजुनी घुमते समर्थं तव वैखरी !
पायि खडावा, कटि लंगोटी
तेज मुखावर, तनू गोमटी
ज्ञान, भक्ति, शक्तीची बीजे पेरिलीत भूवरी ॥ १ ॥
समर्थ, आपण तेज वर्षिले
महाराष्ट्र जन-मना स्पर्शिले
ज्ञानदीप चेतविला आपण साधकांचिया उरी ॥ २ ॥
महाराष्ट्र परदास्यी बुडता
घुमविलीत स्फूर्तीची गाथा
वरदहस्त तव महाप्रतापी शिवरायांच्या शिरी ॥ ३ ॥
घुमली वाणी दरीदरीतुन
चिडून उठले महाराष्ट्र मन
'महाराष्ट्र जय' 'महाराष्ट्र जय' नाद चढे अंबरी ॥४॥
अध्यात्माला दिलीत शक्ती
वैभवास शिकविली विरक्ती
समर्थ अपुला बोध वर्षितो अजुनी अमृतसरी ॥ ५ ॥

# सद्गुरुंचे दर्शन

दा.क्र. 23456
काव्य 25।६।८२
शाखा (स्थळ प्रत)

वि. म. कुलकर्णी

– एका दिवसाने काय दिले ?
जीवनाच्या प्रभातकाळीच, माझ्या या देहाला
कृष्णामाईच्या पवित्र जळाचे
आपादमस्तक स्नान घडविले : थोडे पुण्य गाठी बांधले !

– एका दिवसाने काय दिले ?
तारुण्याच्या चिंचबनातून, मनाला मनसोक्त–
' भर दुपार 'चीच दुनिया दाखवीत फिरवून आणले
प्रपंच कसा आंबटगोड आणि दुर्घट
हे मर्म सांगत सांगत, एक अवघड कोडे घातले ! ....
सज्जनगडच्या उंच पायऱ्या ओलांडल्यावर,
' आनंदवनभुवना ' चे स्वप्न पाहणाऱ्या–
समर्थ सद्गुरूंचे दर्शन घडविले :
पादुकांच्या त्या चंदन-स्पर्शाने आत्म्याला वेगळे वळण दाविले!
तो प्रसादमय क्षण अंत:करणात विरघळत गेला
" **काया बहुत कष्टवावी** "– हाच मंत्र सांगत राहिला
तो गडाहूनही उंच महापुरुष दृष्टीसमोरून झळाळत गेला !
जीवनाच्या रामायणात– ' युद्धकांड ' आणि ' सुंदरकांड '
हेच महत्वाचे हे सत्य बोलून गेला !

– सद्गुरूंनी प्रेमाने सांगाती बनून
' अथांग पाण्यात ' धीराने तरायला शिकवले
संसाराच्या घाटावर आदळणाऱ्या लाटांपाशी
पुन्हा परत आणून सोडले.

– त्या एका दिवशी, सप्तरंगांतून मन अलिप्त होत राहिले
भगव्या रंगाशी जवळीक शोधीत चालले :
सूर्य उगवतीला की मावळतीला जातील,याचे भान नाही उरले! !

# मज रघुनाथजी वेगळें । जिवलग कोण्ही नाहींच

कृ. ब. निकुम्ब

रामदासांनी स्वत:च्या हस्ताक्षरात लिहिलेले एकमेव गद्य पत्र उपलब्ध आहे; पण तेवढेही रामदासांचे व्यक्तिमत्व प्रकट करायला समर्थ आहे. हेळवाकच्या घळीत असताना तिथल्या कडक थंडीमुळे रामदास आजारी पडले. तेव्हा, रघुनाथभट गोसावी यांनी त्यांची सेवा करून, त्यांना उष्ण देशास पाठविले. या पत्रात रामदास रघुनाथभटांविषयीची आपली कृतज्ञता व्यक्त करीत आहेत. 'देवाच्या सख्यत्वासाठीं । पडाव्या जिवलगांसी तुटी ।। सर्व अर्पावें शेवटीं । प्राण तोहि वेंचावा ।।' असे सख्यभक्तीचे लक्षण सांगणाऱ्या रामदासांनी 'मज रघुनाथजी वेगलें कोण्ही जिवलग नाहीं' असा सहजस्फूर्त उद्गार काढावा, हे सुसंगतच आहे. देव आणि भक्त यांचे निस्सीम अद्वैत त्यांच्या अनुभवास आलेले होते. त्यामुळेच, रघुनाथभटांचा उपकार स्वत:वर झाला, असे त्यांना वाटत नाही; तो 'रघुनाथजीस जाला' अशी त्यांची श्रद्धा आहे. 'आवडीच्या कळवळचाने' लिहिलेल्या या पत्राने रामदासांच्या अंत:करणाची मनोमन साक्ष रघुनाथभटांना तर पटली असेलच, पण राम आणि रामदास यांच्या एकात्मतेची ग्वाही आपल्यालाही पटावी. या बहुमोल पत्राचा, रामदासांच्या आशयाशी आणि शब्दसरणीशी शक्यतो प्रामाणिक राहून केलेला एक ओवीबद्ध अनुवाद म्हणजे ही कविता !

मूळ पत्र : श्रीसमर्थहृदय, द्वितीय खंड, पृष्ठे ५७३–७६.

अलंकृत उत्तम गुणांनिशी । भक्तिपरायेण राजश्री
रघुनाथभट गोसावियांसी । स्नेहपूर्वक सूचना;
निरोप घेऊन साचार । हेलवाकीहून जालों स्वार
सुखरूप यथाकाल । चाफलास पावलों
योजिलिया संकल्पाची । समारादनाहि जाली साची
पुढें देहोपचाराची । सोये होये हळू हळू
तुमचे मन मजवरी बहुत । तुमचे आवडीच्या गुणें होईल हित
चिन्ह ऐसें नेमस्त । दिसत असे
ते कर्कष सीतलाईंत । आपण श्रम पावलों बहुत
तो माझा श्रम घेऊन अगत्य । निरोप दिधला तुम्ही

देव जाणे तो उपकार । येविसी चीत चमत्कारले अपार
पत्रीं लेहावें कोठवर । उमग न पडे !
माझें अरिष्ट तुम्हीं घेतलें । मज ऊष्ण देशासी पाठविलें
हे तों उपकार जाले । श्री रघुनाथजीस !
वृत्त जें जें जैसें घडलें । रघुनाथजीस विदित केलें
मज रघुनाथजी वेगलें । जिवलग कोण्ही नाहींच !
आतां माझे ठायीं तुम्ही आहां । रघुनाथकृपेचा प्रत्ययो पाहा
प्रचीतीसि कलों येईल तुम्हा । बहुत काये लेहावें ?
दिवाकरभट आलियावरी तेथ । ये प्रांतीं यावें समाचारार्थ
स्नेह असो दीजे बहुत । पत्रार्थ हा
आवडीच्या कळवळयाचे हे बोल । मनें मन साक्ष असेल
परि उपचार वाटोनि रंजीस व्हाल । तरी तैसें न करावें
तुम्ही दिवाकरभटां जैसे । कळो, हा इत्यर्थ मनीं वसे
आपुला येकांत प्रसंग जालियावरि ऐसें । लिहितां न ये !
ये संधीत प्रसंग फ़ावला । फावे न पुढें म्हणौनि विस्तरें लिहिला
वरकड भाव मनीं असला । तरी साक्ष असे रघुनाथ !
म्हणौनि रंजीस न व्हावें । येथ मिथ्या स्तुती ऐसें न म्हणावें
तुम्ही सर्वज्ञ, जाणावें । लिहिलें सत्य तेतुलें
तुमचें तें तें माझेंचि सगलें । म्यां मज मनास येईल तैसे लिहिलें
येथें तुमचें काये गेलें ? । चिंता न करावी कांहींच
तुम्ही आहांत आमुचे । तुम्ही-आम्ही सकल देवाचे
काये येथ शरीर-भेदाचें ! । पाहावी अंतर-स्थिति

# करुणाष्टके

गंगाधर महाम्बरे

दिवसयामिनी विश्वच गाइल किती शतकोशतके ।
रामदासा; स्तोत्ररूपे तव अमर करुणाष्टके ।।

रामरायासाठी आपुली निरसुनिया माया
रविकुळटिळका आळविले तू दुरित दुरी हराया
तळमळले मन, जीव कळवळे, लोचन उभयही भुके ।।

रघुपतिठायी चित्त गुन्तले मानुनि सुखदाता
रामनामे पुसुनि टाकिली तूच उदासीनता
अंतःकरणा भिडती उत्कट तुझे शब्द कौतुके ।।

अनुदिनि अपुल्या सुप्त अवगुणी वाहुनिया खंत
अमृत लाघव बोले ' राघव उपासना श्रेष्ठ '
प्रपंच आणिक परमार्थाचे क्षण केले नेटके ।।

# नशिबाचा खेळ

योगेश्वर अभ्यंकर

(अभंग)
नशिबाचा खेळ सारा
ऐसे कधी म्हणू नका
प्रयत्नाचा डाव अर्धा
पूर्ण करा सोडू नका ॥ धृ० ॥
प्रयत्नाचा डाव खेळी
निर्धाराने रामदास
'सावधान' ऐकताच
तोडलेले मोहपाश
रामकृपा लाभताच
सुटलेला पेच बांका ॥ १ ॥
रामकृपा होताक्षणी
अलौकिक कार्य केले
अद्भुत काही त्यांनी
प्रयत्नांनी घडविले
'यत्न देव' शब्द त्यांचे
ध्यानि ठेवा, वेळ बांका ॥ २ ॥
'दासबोध' स्फूर्ती देतो
रामदास भेटतात—
रामनाम गाताक्षणी
भवबंध तुटतात
संजीवनी रामकथा
तारणारी रावरंका ॥ ३ ॥

## कवीवरा....

मोरेश्वर पटवर्धन

सह्यगिरीच्या कडेकपारी उमटलि तव पाउले
उद्धरली ही शापित धरणी तुझिया प्रतिभाबले ॥ धृ० ॥

ताठ मनांची ताठ कण्यांची दिलीस तू प्रेरणा
मरगळलेल्या मनामनातिल जाणुनिया वेदना
जणु रामांच्या कोदंडाचे प्रतिध्वनी उमटले ॥ १ ॥

खळाळला जधि तव वाणीचा प्रपात या भूवनी
आर्तजनांना पुरुषार्थाचे बोध दिले तू मनी
मराठमोळ्या शब्दांचे तू सार्थ बाण सोडले ॥ २ ॥

हलवुनिया गदगदा लोक हे जागविले, कविवरा
कर्तृत्वाने तेज पूजिले जागृत केली धरा
पूजन करण्या तुवा शक्तिचे पीठ येथ स्थापिले ॥ ३ ॥

विस्मरणातिल आर्यधर्म तू जागृत केला जनी
समाजधारक, धर्मसुधारक लोकांचा अग्रणी
असे लाभले याच भूमिवर-क्षात्रतेज आगळे ॥ ४ ॥

## अक्षरपूजित कवीश तू !

गं. रा. पाठक

संत समर्था, समर्थ संता ! सूर्यजलातिल मौक्तिक तू
सूर्य-कृपेचा या भूमीवर किरण सचेतन उज्ज्वल तू
राम धनुर्धर राजमंडला मुकुटमणी शतलक्षगुणी
वीररवी रमि राम-चंद्र तो भक्तांच्या अंत:करणी
एक तयाचा भक्त जयाच्या करी विराजे द्रोणगिरी
सुधातेज अन् तेजसुधा ज्या द्रोणी संजीवक लहरी
दुजा तयाचा समर्थ सेवक करांगुलींनी पूर्ण करी
जीवनबोधे बोधजीवने अक्षरलेखा अमर खरी
तुवा मनाच्या अश्वावरती विचारवीरा ठाण दिले
वीर विचारी शब्दशरांनी हीन मलिन ते छेदियले
पुन्हा एकदा तू हनुमंता या भूमीला शोधियले
शोकवनाच्या मातीला आनंदवनाचे भुवन दिले
तव सामर्थ्ये तू भिक्षेला करभाराचे ओज दिले
भक्तीला शक्ती दिधली अन् शब्दांना शररूप दिले
या देशाच्या मातेला तू आण घालुनी जागविले
तिचिया हाती तिच्या नृपाला रक्षुनिया तू वाढविले
वैराग्या राजा दिधला तू राजाला वैराग्य दिले
या देशाच्या परमेशा 'श्रीमंत योगि' नव बिरुद दिले
'हर हर महादेव' शब्दांना शिवे यज्ञ हुंकार दिला
तू 'जय जय रघुवीर समर्था' तुष्टीचा उद्गार दिला
तू गोदेचा तरंग होउनि कृष्णेला कल्लोळ दिला
महाबलेश्वर करी होउनी त्रिशूल त्या शब्दार्थ दिला
सरस्वतीच्या करी विराजित रामाचा कोदंडचि तू
पूजा तुजला काय करावी ? अक्षरपूजित कवीश तू

# कृतार्थ जीवनगान

कल्याण इनामदार

कृतार्थ जीवनगान समर्था, कृतार्थ जीवनगान
तूच पेरला मनी मानसी स्वजन सार्थ अभिमान ॥

घराघरातुन चैतन्याचे दिवे लावुनी दिवे
स्वधर्म-प्रेरित अध्यात्माचे अर्थ निरूपले नवे
काया, वाचे, आत्मानंदे केले कार्य महान ॥

प्रपंचातुनी परमार्थाचे धडे घालुनी दिले
साक्षेपी मंत्राने अवघे भूमंडल हलविले
मरगळल्या मातीत पाळली आभाळाची शान ॥

काजळ होता काळोखाची झापड डोळ्यापुढे
काळाची पाउले ओळखुन वाजवले चौघडे
सावधानता हेच मानले अचूक सूत्र निदान ॥

शत्रूसाठी संहाराचे कृपाण घेउनी हाती
संकट-मोचन श्रीरामाची सांगितली नीती
शक्तीच्या भक्तीने केले राष्ट्र पुरे बलवान ॥

यत्न जाणुनी परमेशाचे रूप सदा सर्वथा
संसाराचे मर्म शोधले विरक्त राहुन स्वतः
बोधामृत पाजून ठेवले सकल दूर अज्ञान ॥

# आग वणवा पेटला

न. म. जोशी

सह्याद्रीच्या सावलीला
पेठ नामे ‘ रामभक्ती ’
मंत्र दिधला रामदासे
शक्तिमार्गे जीवमुक्ती ।

तैलभक्तीचा अभिषेक
शक्तिमूर्ती मारुतीला
दासबोधाच्या शब्दाची
साथ होई जीविताला ।

भव्य कातळाच्या पोटी
करी चिंतनाचा मठ
थंड मातीतुनी आग–
उठे ठिणग्यांची लाट ।

रामदासे बांधीयले
शक्तियुक्तीचे तोरण,
तेथ शिवबा अवतरे
हाती भवानी घेऊन ।

मंत्र जीवनाचा थोर
रामदासे सांगितला
फुटे स्वातंत्र्याचा कोंभ
जुलुमाच्या जोखडाला ।

जांबवासी नारायण
दास रामाचा होऊन
वास सज्जनगडी करी
शक्तीमुक्तीचे साधन ।

ऐशा रामदासे तेव्हा
अवघा मराठा मेळविला
एका ठिणगीचा मग
आग वणवा पेटला

# अंगाई पाळणा गाते

**(बाळ नारायणाला मातोश्री राणूबाईंनी म्हटलेला पाळणा)**

गोविंदस्वामी आफळे

मी झोपविते नारायण बाळाते
अंगाई पाळणा गाते ।
घरि जमलेली गर्दी भक्तजनांची ।
ती नवमि रामजन्माची ।।

भर दुपारची बाराची ती वेळ
श्रीराम जन्म-कल्लोळ ।।

तो घोष रामनामाचा
घरि गज़र चालला साचा
आनंदे मांगल्याचा
या वेळि तुझे जनन बालका होते
अंगाई पाळणा गाते ।। १ ।।

घरि सूर्याजी ठोसर ते तेजस्वी
संसारी असुन तपस्वी ।।

आम्ही सूर्याचे श्रीरामाचे अंश
धन्य धन्य आमचा वंश ।।

श्रीकृपा असे वरदहस्त देवाचा
आशिर्वाद हि दैवाचा ।।

देव दैव दोघे मिळुनी
मम उदरि जन्म घेवोनी
वाटते तुला पाहोनी
मद्‌हृदयाची तृप्ति बालका होते
अंगाई पाळणा गाते ।। २ ।।

तू बालपणी झोप शांत रे आता
पुढती विश्वाची चिंता ।
किति हालविसी पाळण्यात रे चरण
पुढती तुज देशभ्रमण ।
का मुठी अशा आवळशी, आपटशी
पाळण्यास धक्के देशी ।।
हे चिन्ह भावि कार्याचे
मज दिसते बाळा साचे
वनवास कष्ट करण्याचे
व्रत घेशिल का ? देशा जागविण्याते
अंगाई पाळणा गाते ।। ३ ।।
शुक होशिल तू ज्ञानी पुण्यश्लोक
रचुनिया "मनाचे श्लोक" ।।
किति भवताली जमविशील नव-तरुणा
"दासबोध" देशिल त्यांना ।।
तू म्हटलेले 'करुणाष्टक' ऐकोनी
श्रीराम पाझरे नयनी ।।
गर्जून 'सवाया' म्हणती
पंचारति आरति करिती
ही आत्माराम प्रचीती
हा घोष सख्या साह्य होत शिवबाते
अंगाई पाळणा गाते ।। ४ ।।

# आरती

इंदिरा संत

वडिलांच्या मांडीवर पेंगत असताना, मला,
त्यांचे खडे सूर ऐकू येत असतात.
गाणे कुणाचें, काय, समजत नसते.
जाता येताना खेळताना, ओठांतून एकच लय येते–
" मनमोहन मेघश्यामा "–
ते ऐकून ऐकूनच की काय,
आमच्या देवांची पूजा करणाऱ्या गुरुजींनी
आळवून घेतलेली असतात करुणाष्टके,
मला देवापुढे वसवून.
'अनुदिनिं अनुताप,' 'जळत हृदय' हे काही समजत नसते.
पण वाटते,
स्वामी देव्हाऱ्यासमोर उभे राहून राघवाला
" धाव रे धाव आता " म्हणताहेत.
माझ्या मनात तशीच काही घालमेल होते आहे.
जरा जाणती होते,
पाटी दप्तर घेऊन शाळेला जाऊ लागते आणि
काळ्याभोर फळ्यावर, मास्तर सुरेख अक्षरांतून देतात
मनाचे श्लोक, रामदासांचा एक चिमूट प्रसाद.
प्रत्येक श्लोकात उभे असतात समर्थ
हातात छोटे छोटे पलिते घेऊन आमच्यासाठी–
" अक्षराच्या वळणाचे " " अखंडित वाचनाचें "
" किर्तिरूपे उरण्याचे."
जाणती होते. संसाराची समजूत होते.
एक थोर समर्थभक्त हातावर ठेवतात 'दासबोध',
एका शुभ योगावर.

फक्त सांगतात ‘ तू याचे मनन कर. ’
ती सरळसाधी रोखठोक गीता........
माझ्या बाळबोध मराठी मनाला एकदम आपली वाटते.
ती मस्तकाला लावते. मनात साठवते.
ती जाणवून देते संसाराचे सौंदर्य आणि
समाजाचे क्रौर्य.
देते आचारांना ध्येय आणि विचारांना अस्मिता.
देते पावलांना शक्ती आणि भावनेला भक्ती.
तनमनाच्या निरांजनांनी त्या गीतेवरून
ओवाळलेली ही आरती.

# समर्था, घे अवतारा

पद्मावती गोळे

" शुभ मंगल सावधान," ऐकुनि, सावध तूं झालास ।
सावध होऊनि, धावत जाऊनि रामपदीं पडलास ।
उग्र तपस्या कुणी शिकविली, तुजला नारायणा ।
ब्रह्मचर्यव्रत आचरुनीया, करिसि बलोपासना ।
वायुसुतापरि मनवेगाने, यात्रा केल्या किती ।
पूर्वपश्चिमा, दक्षिणोत्तरी, चरण तुझे धावती ।
दिव्य चक्षुनी, तुवां देखिले, शत्रु मायभूचे ।
मर्म जाणिलें तुवांच संता ! बलोपासनेचें ।
ठायीं ठायीं, करूनि स्थापना वीर मारुतीची ।
वीर निर्मिले, लाज राखण्या भारतमातेची ।
योगीश्वर तूं साक्षात्, सज्जन खरेंच मन तूझें ।
बोध तयाला, नव्हे–जगाला, हेच सार त्याचें ।
छत्रपतींनी अर्पण करिता स्वराज्य तव चरणीं ।
भगवीं छाटी दिली तयातें, तू प्रसाद म्हणुनी ।
गुरू अलौकिक, शिष्य अलौकिक, परस्परां जाणती ।
सत्तेने संन्यस्त असावें, हेंच जगा शिकविती ।
छत्रपतींनी भगवा केला, राष्ट्रध्वज आपुला ।
गुरु शिष्यांचा ऐक्यध्वज नभि सामर्थ्यें फडकला ।
आज समर्था, घे अवतारा, पुनरपि या जगतीं ।
गोंधळलों रे, अजाण सारे, ने आम्हा सुपथीं ।
ज्ञान वाढलें, मोहमार्गही, इथें तिथें पसरले ।
मन न राहिले सज्जन, संता, गोंधळून गेलें ।
माय-बाप हो तूंच समर्था । बोध बालकां करी ।
प्रयत्न, प्रचिती, प्रबोध, यांची वाट दाखवी खरी ।

# समर्था! जन्मा या हो पुन्हा!

संजीवनी मराठे

या भूमीच्या कुशित समर्था ! जन्मा या हो पुन्हा
इथे उमटवा पुनरपि अपुल्या भगव्या पाउलखुणा !
असंयमाची चढली धुंदी मनामनांच्यावर
अराजकाच्या तळीं करपला प्रज्ञेचा मोहर
श्रेयाचा पथ करा प्रकाशित तेजोनारायणा !
कुठली मुक्ती, नकली भक्ती, फसवे संकीर्तन
मठात नुरले महंत, सरले आराधन पूजन
भोगलालसा वेढुन वसली अवघ्या जनजीवना !
श्रमजीवींना मिळो प्रतिष्ठा, रंका लाभो धन
दीनदुर्बळां मिळो आसरा, उन्मत्ता शासन
दाखवुनी द्या सद्धर्माची दिशा देशकारणा !
रामदास तुम्हि जीवनयोगी प्रेरक सामर्थ्याचे
कार्यामागे दिले योजुनी अधिष्ठान देवाचे
'जय जय रघुविर समर्थ' अपुली नादविली घोषणा !
श्रीरामा कथिलीत वेदना रचुनी करुणाष्टके
दासबोध रचुनिया पुरविली भक्तांची कौतुके
मनभुवनांतिल आनंदाचे स्वप्न दिले बहुजनां !
लाभे स्फूर्ती स्मरता कीर्ती कवीश्वरा ! आपुली
चार भाबडी शब्दफुले ही चरणांवर वाहिली
ऐकुनि धावा, सत्वर पावा, पुरवा मनकामना !
या भूमीच्या कुशित समर्था ! जन्मा या हो पुन्हा !!

## पुण्यश्लोक समर्थ !

योगिनी जोगळेकर

म्हणू वाचेने ' समर्थ '
करू येवढा पुरुषार्थ
रोमरोमी एकच समर्थ–
रामदास ॥१॥

जाऊ तीर्थाचीया ग्रामा
घेऊ वरीवरी नामा
मारुती मागुती श्रीरामा–
रामदास ॥२॥

चढू सज्जन-गडासी
चित्त अ-सज्जन ग्रासी
सच्चा एक रहीवासी–
रामदास ॥३॥

पाठ मनाचीये श्लोक
वर्तणूक आणि एक
तोची एक पुण्यश्लोक–
रामदास ॥४॥

किती तुला रे आठवू ?
चित्ती कसे रे साठवू ?
कोण्या सुवर्णी गाठवू ?–
रामदासा ॥५॥

तोच समर्थाचा स्वामी
बाकी वृथाचेच ' मी ! मी !'
सूर्यकिरण या तमीं–
रामदास ॥६॥

# नमस्कार माझा तुम्हा श्रीसमर्था

शांता ज. शेळके

जया अंतरी पूर्ण श्रीरामभक्ती
जया रामनामी मिळे दिव्य शक्ती
जयें गाइली आदरे रामगाथा
नमस्कार माझा तया श्रीसमर्था ! ॥१॥

जरी राहिला डोंगरीं दास दूर
जनांचा दिसे वाहता त्यास पूर
दिसे दैन्य, दारिद्र्य, अज्ञान, चिंता
नमस्कार माझा तया श्रीसमर्था ! ॥२॥

जये देव बंदीतुनी सोडवीले
नव्या राजधर्मा जगी रूढवीले
प्रजापालनी जो असे दक्ष भारी
तुम्हा पूज्य तो राम कोदंडधारी ॥३॥

असे शक्तिसंपन्न जो वायुपुत्र
हनूमंत जो श्रेष्ठ श्रीरामदूत
असे भव्य उत्तुंग जो बुद्धिदाता
दिले दैवता त्या आम्हा श्रीसमर्था ॥४॥

तुम्ही जागवीला महाराष्ट्र-धर्म
कळे शक्तिचें युक्तिचे मुख्य मर्म
तुम्ही जीवना लोक प्रवृत्त केले
प्रपंचातले सार सिद्धीस नेले ॥५॥

प्रपंचीं असावे कसे सावधान
असावे तरी नित्य अध्यात्मभान
तुम्ही दाविली जीवनाची इयत्ता
नमस्कार माझा तुम्हा श्रीसमर्था ॥६॥

विवेकासवे जेथ चातुर्य आहे
प्रपंचातली जेथ जाणीव आहे
जिथे आत्मभानासवे नीतिमत्ता
तया 'दासबोधा' स्मरू श्रीसमर्था ! ॥७॥

मनाचे तुम्हा पूर्ण चांचल्य ठावे
तसे इंद्रियांचे तुम्हा ज्ञात गोवे
तयां संयमाने कसे आकळावे
तुम्हाकारणे ते अम्हाला कळावे ॥८॥

तुम्ही सुंदराचे दिले सूक्ष्म भान
दिली लोचना कोवळी रम्य जाण
निसर्गातली चेतना जाणवीली
नवी एक संवेदना बाणवीली ॥९॥

तुम्ही उग्र वज्रापरी पेटणारे
तुम्ही कोवळे स्नेहसे भेटणारे
विवेकी, विरागी तुम्ही सत्त्वधारी
तुम्ही जाणते लोक-कल्याणकारी ॥१०॥

तुम्ही सर्व जाणून सर्वा अतीत
जनाकारणे आयु केले व्यतीत
तुम्ही सर्वदा वाहिली विश्वचिंता
नमस्कार माझा तुम्हा श्रीसमर्था ॥११॥

कधी अंतरी या वियोगार्त दाटे
उभा सर्व संसार निस्सार वाटे
क्षणी त्या सखा एक श्रीराम दाता
तुम्ही जाण आम्हा दिली श्रीसमर्था ॥१२॥

असे राम देता, असे राम घेता
असे राम भोक्ता, असे भोगवीता

पहावे मनीं नित्य त्या साक्षिभूता
तुम्ही जाण आम्हा दिली श्रीसमर्था ।।१३।।

उदासीनता अंतरीं नित्य राहो
मना राघवाचा सदा होइ लाहो
तयावाचुनी अन्य कोणी न आता
तुम्ही जाण आम्हा दिली श्रीसमर्था ।।१४।।

समर्था तुम्हा भक्तिने आठवावे
तुम्ही बोलिले ते मनी साठवावे
अता ठेविते पाउलीं नम्र माथा
नमस्कार माझा तुम्हा श्रीसमर्था ।।१५।।

## सज्जनगड

कै. कुंजविहारी

सज्जनगड हे नाव ठेविले तुझे जयाने जगी अधी
'शब्दसृष्टिचा ईश्वर' तो तुज, आठवतो का सांग कधी ?

प्रश्न ऐकुनी विनोद वचने, डोंगरमाथा म्हणे तया
विचार वेडया भल्या माणसा, तुझ्या बुद्धिची येत दया
तुझी तुला ना ओळख पुरती, असा शहाणा विसराळू
दगड-मातिच्या संगतीत तुज, येइल बुद्धी हळू हळू
जिथे जिथे जड तिथे तिथे जगि, चैतन्याचा गुप्तनिधी
'शब्दसृष्टिचा ईश्वर' तो तुज, आठवतो का सांग कधी ?

समर्थ गुरुची इथे पाउले, हृदय उघडुनी पहा जरा
स्वराज्यशक्ती सुराज्यभक्ती, राज्यनीतिचा इथे झरा
स्वभावमंदिरि राम रमाया, विवेक सुंदर दृष्टि हवी
तिथे प्रकटतो श्लोक मनाचा, महाजनांचा महाकवी
समर्थ कविची काव्यसंपदा, मंत्रशक्तिची प्रभावना
मनामनातिल पाप जाळिते, जागविते जनि जनार्दना
देव मस्तकी, धर्म अंतरी, कर्म स्वयंभू शस्त्र करी
समाजसन्मुख पराक्रमाची, गुरुकिल्ली ही खरोखरी
देव-धर्म-गुरु-मंत्र-शक्ति जगि पंचशील गुणि वनौषधी
'शब्दसृष्टिचा ईश्वर' तो तुज, आठवतो का सांग कधी ?

पंचमुखी प्रतिपरमेश्वर तू, आजकालचा कविराजा
रामदास तू, रामदूत तू, श्रीरामाहुनि जरा खुजा
नसले झाले रामराज्य जगि, तरी राम ना वनवासी
तया शोधिते श्रीसीतासति, लवांकुशाची फौज तशी
मायमुलांचे करि संगोपन, पुराणकालिन एक कवी
कवि वाल्मिकिचा तुला वारसा, घेइ सज्जना शपथ नवी

मातृभूमिच्या सुता नाठवे, पिता आपुला जुनी कथा
आजकालच्या वाल्मिकिला ना, राम आठवे नवी व्यथा
याच व्यथेने जीवन भ्रमले, किति पर्वतगड हादरले
त्रिकालज्ञानी कलावंत तू, कारण याचे तुला कळे
जा सूर्यावर, जा चंद्रावर, नवग्रहावर राज्य करी
परंतु रावण होउ नकोरे, राम शोधुनी आण घरी
विश्व-कुटुंबी ब्रह्मभावना, उधळि सृष्टिवर उदारधी
'शब्दसृष्टिचा ईश्वर' तो तुज, आठवतो का सांग कधी ?

(पुनर्मुद्रण)

# जाहले पावन कुबडीतीर्थ
('गीत दासायना'तून)

बबनराव नावडीकर

साक्ष चिरंतन इथे भेटले। शिवबा आणि समर्थ।
जाहले पावन कुबडीतीर्थ ॥ धृवपद ॥

महाराष्ट्राच्या मुक्तीसाठी। जिवाशिवांच्या घडल्या भेटी।
इथेच घडला देशासाठी। दासांचा परमार्थ ॥ १ ॥

शिवशक्ती करि शत्रूदमना। दासबोध करि मार्गदर्शना।
ब्राह्मतेज अन् क्षात्रभावना। समरसल्या निःस्वार्थ ॥ २ ॥

अशाच एका माध्यान्हीला। ऊन रणरणे चहुबाजूला।
शिवबा आले गुरुभेटीला। होउनि श्रांत तृषार्त ॥ ३ ॥

वंदन करिता शिवरायाने। सद्गुरु जाणति अंतर्ज्ञाने।
सरकविती पाषाण कुबडिने। प्रगटे कुबडीतीर्थ ॥ ४ ॥

कुबडी होती जरि काष्ठाची। सत्संगे ती हो वज्राची।
वज्राघाते धरणि दुभंगुनी। उसळे निर्मल तीर्थ ॥ ५ ॥

तीर्थप्राशन करि शिवराया। सहजचि पडली जलि पडछाया।
पडछाया ती तशीच राहिलि। झाले तीर्थ कृतार्थ ॥ ६ ॥

अजून दिसते ती पडछाया। तीर्थ प्राशितो श्रीशिवराया।
श्रद्धेच्या नेत्राने बघता। जाणुनिया भावार्थ ॥ ७ ॥

(पुनर्मुद्रण)

## सावधान

श्रीराम बाळकृष्ण आठवले

सावधान ऽऽ सावधान !
कोण असे मी राखी भान ! ॥ धृ० ॥
देहदास तू नसशी रे
'रामदास' तुज होणे रे
असशी काय अजाण ? ॥ १ ॥
प्राप्तव्यच जर मिळवावे
स्वजन सकळही त्यागावे
इतके दे अवधान ! ॥ २ ॥
ईश्वरदर्शन जर ध्येय
सर्वस्वच मग दातव्य
तुज रामाची आण ! ॥ ३ ॥
घरटे सोडुनि घेइ भरारी
वैनतेय हो गगनविहारी
तर भवसिंधु महान ! ॥ ४ ॥
'मी, माझे' हे झटकावे
विश्वात्मक तत्क्षणि व्हावे !
स्वीकारी आव्हान ! ॥ ५ ॥

(पुनर्मुद्रण)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क.
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

# त्यांना कोटि कोटि प्रणाम

श्रीधरदास तथा ल. शं. भावे

काळी कभिन्न कर्दनकाळ
अमावास्येची होती रात्र
भयंकर गडद अंधार
जिकडे तिकडे हाहाकार
पिसाळल्या भुतांचा दरबार
वखवखलेली श्वापदे
मरणाऱ्या गाईंचे हंबरडे
भ्रष्टाचारा मोकळे रान
बिचाऱ्या पोरी हैराण
देव डुबले विहिरींत
गाडले गेले मातीत
देवळे निघाली मोडीत
नंगानाच देशात
तडफड रामदासांच्या मनात
तोडली लग्नाची बेडी
ठोकली गोदेपार उडी
दोन तपे मारली दडी
जळत्या आगीत घेतली बुडी
करून भयंकर तातडी
उठवली मेल्या मनांची मढी
नागोबांची ठेचली फडी
केली शत्रूवर कडी
मारली माजुऱ्यांना छडी
बसवली धर्माची घडी
उभी स्वराज्याची गुढी
मिराशी साधली साधली बडी
त्या समर्थ शिवरायांना कोटि कोटि प्रणाम ।
न करू तर आम्ही हराम ॥

(पुनर्मुद्रण)

# समर्थ जीवन तुझे समर्था!

जयंत भिडे

समर्थ जीवन तुझे समर्था
कथिले पुरुषार्था
श्रीरामाचा दास जाहला
धन्य लोककर्ता ॥ धृ० ॥
झंझावाती अवघे जीवन
पदस्पर्शाने भूमी पावन
आदरभावे लवतो तुझिया
चरणावर माथा ॥ १ ॥
गिरीदुर्गातुन घुमली वाणी
चैतन्याचा फुलवित वन्ही
कथिलीस तू कणाकणाला
रघुराजाची कथा ॥ २ ॥
जागवुनी तू जनामनाला
जगविलेस तू या राष्ट्राला
राष्ट्रधर्म तू जागविणारा
धन्य राष्ट्रकर्ता ॥ ३ ॥
दासबोध हा अमृतसंचय
अलौकिकाचा मूर्त परीचय
प्रयत्नवादा देव मानुनी
कथिले परमार्था ॥ ४ ॥
रामभक्तिची छेडुन सरगम
फिरलासी तू प्रदेश दुर्गम
जागोजागी स्थापिलेस तू
देवा हनुमंता ॥ ५ ॥
(पुनर्मुद्रण)

# श्रीसद्गुरु समर्थ

नाना देवधर

'सावधानी' जे सावधान जाले
आणि इतरांसि सावध केले
ते प्रसंग-अवधानि भले
रामदास ।।
तयांचा ग्रंथ रत्नाकर
भावे तुज करो सादर
जो तारक-भवसागर
अवघियांसी ।।
तयात करी अवगाह्ने
शत-आठ निमज्जने
वेव्हारी तरी काय उणे
पडे केवीं ।।
जो कल्पतरु बोधाचा
दाता ईप्सित फळांचा
आला तव अंगणी साचा
पोशी तया ।।
सेवुनी त्या व्हावे पूत
अर्जावे चारी पुरुषार्थ
'महाराष्ट्र' नाम करावे सार्थ
आत्मतेजे !

(पुनर्मुद्रण)

২

| | | | |
|---|---|---|---|
| १ | नारायण जन्मले | अर्विंद देशपांडे | ३७ |
| २ | वंदन | ना. मा. सरपटवार | ३८ |
| ३ | युगद्रष्टा | रा. श्री. पंचवाघ | ३९ |
| ४ | जगी धन्य हा दास | सौ हेमलता रा. मुंदडा | ४० |
| ५ | श्रीशिवराज्याभिषेक | भालचंद्र लेम्भे | ४१ |
| ६ | धन्य रामदास | दि. वि. कुलकर्णी | ४२ |
| ७ | पावन गोदातीर | अर्विंद पाटोळे | ४३ |
| ८ | राष्ट्रगुरू तू-महापुरुष तू | दिगंबर रेखी | ४४ |
| ९ | समर्थ-शक्ती | गोपाळ टाकळकर | ४५ |
| १० | प्रशस्तिः | सौ. विद्या करमरकर | ४६ |
| ११ | जय जगत् | द्वारकानाथ तांडेल | ४७ |
| १२ | श्रीसमर्थगीत | नन्दकुमार वाघमारे | ४८ |
| १३ | आरती | सौ. नीता पुल्लीवार | ४९ |

## नारायण जन्मले –

अरविंद देशपांडे

सूर्यकुलाचे स्थंडिल पेटुन अनल जणू बोले ।
सूर्यप्रसादे सूर्याजीघरी नारायण जन्मले ।
भर माध्यान्ही नवमीला अन ।
चैत्रामधल्या फुलले नन्दन ।
जांब गावच्या वनावनातुन पान पान हासले ।
सरल नासिका विशाल डोळे ।
पाळण्यात ते बालक खेळे ।
बाळमुठीतुन महाराष्ट्राचे भविष्य ते झाकले ।
अन वार्तेचा सुगंध पसरे ।
उन्हातही होउनिया हसरे ।
गोदावरिजल होउन चंचल उदंड थयथयले ।
स्वदेश आणि सत्‌धर्माचा ।
हा उद्धारक होइल साचा ।
चाफळ खोरे सह्याद्रि अन् सिंहहि गुरगुरले ।
सूर्यकुलाचे स्थंडिल पेटुन अनल जणू बोले ।
सूर्यप्रसादे सूर्याजीघरी नारायण जन्मले ।

## वन्दन

ना. मा. सरपटवार

''सावध'' शब्द परिसुनी सावध होउनि जगी समर्थाने।
संन्यास घेउनीया केला राष्ट्रप्रपंच नेटाने ॥१॥

लोपूनि स्वधर्म सारा परकीयांचे पवाड गाण्याची।
आली होती वेळा स्वत्वसमर्पण काढून जगण्याची ॥२॥

पाहुनि कष्टदशा ही नारायण चित्ति फार कळवळला।
करुनी बोध मनाला सुप्त महाराष्ट्रधर्म जागविला ॥३॥

देशाच्या, धर्माच्या, अभिमानाचाहि पोत पेटविला।
'सामर्थ्य चळवळीचे' पटवुनि नैराश्यतिमिर घालविला ॥४॥

पुण्यस्मरण जयाचे आजहि चित्तात आस पालवते।
होउनि विनम्र शिरवन्दन त्यांच्या पदारविन्दाते ॥५॥

## युग-द्रष्टा

रा. श्री. पंचवाघ

आता वंदू कवेश्वर । शब्दसृष्टीचे ईश्वर ।
मराठी मनी वैश्वानर । चेतवीला ॥१॥
'वन्ही' मनीमानसात । दान करी चैतन्यास ।
संन्यासी स्वामीपणात । व्यवहार ॥२॥
चातुर्ये करा संसार । आपणची केला गजर ।
स्वप्न सामान्याचे साकार । सार्थ केले ॥३॥
सार्थकी लागाया तत्त्व । ठेवा नित्य बोधसत्त्व ।
ञाणवा संसारी संतत्व । सांगितले ॥४॥
खडबडुनी उठविला जन । केला चैतन्ये प्रसन्न ।
तत्त्वास दिले आसन । परतत्त्वाचे ॥५॥
विचार मौलिक उदंड । बाजू काढले पाखंड ।
जाणा "अंतरिचा कोदंड" । उद्‌बोधिले ॥६॥
साधून समाज-प्रबोधना । दृढ केली बलोपासना ।
सत्कर्माची भावना । चेतविली ॥७॥
रचोनिया दासबोध । अमृततत्त्वाचा शोध ।
प्रगटला जणू वेद । महाराष्ट्रदेशी ॥८॥
सांगितला शिष्टाचार । करा प्रथम संसार ।
विवेके आचार-विचार । बोधियला ॥९॥
शिवरायाचे आठवणे । चालणे जसे बोलणे ।
कठोर कर्माचे करणे । सुवर्णाचे ॥१०॥
भगवंताचे अधिष्ठान । महाराष्ट्राचे प्रतिष्ठान ।
सार्थ कसा अभिमान । वाढवीला ॥११॥
चिंता केली या विश्वाची । संन्यस्त संसाराची
गाठ घातली बंधनाची । अतूटची ॥१२॥
समस्त महाराष्ट्र भूमंडळी । यात्रा साधली आगळी ।
मने सांधली पांगळी । आत्मरूपी ॥१३॥
पहिला जाणुनी स्वधर्म । यज्ञी अर्पियले कर्म ।
स्थापितसे महाराष्ट्रधर्म । युगद्रष्टा ॥१४॥
ठोस निश्चयाचे प्रणेते । ज्योती ज्योत उजळते ।
खोलवरी जीवनाते । दीपस्तंभ ॥१५॥

# जगी धन्य हा दास

सौ. हेमलता मुंदडा

दासबोधाचा रचयिता स्वामी
'रामदास'–मूळ नाव नारायण ।
बारा वर्षे तपश्चर्या
व केले देशपर्यटन ।।
मनास आवरून रामरूपाठायी
दाविले समरसून ।
हरिनाम नेमस्त हा रामदास ।।
ज्ञान दिले अगाध या समाजास ।
बालपणी ही वृत्ती विरक्त
चिंतनशील हा असे ईश्वरभक्त ।।
असे ज्ञान, वैराग्य, सामर्थ्य अंगी ।
एकांत विचार हा क्रियाशील योगी ।।
जगी धन्य हा दास पुरुषोत्तमाचा ।
ऋणी हा समाज राहील भक्तिभाव तयाचा ।।

# श्रीशिवराज्याभिषेक

भालचंद्र म. लेम्भे

परदास्याचा तिमिर भेदुनि, रवि उदया आला ।
परित्राण साधूचे, करण्या, शिवप्रभु अवतरला ।।

अभिषेक त्या आज जाहला, रायगडावरती ।
धन्य जाहली भारतमाता, महाराष्ट्र धरती ।।

युगायुगांचे सिंहासन हे, पवित्र झाले आज ।
लवले मस्तक परकीयांचे, उतरुनिया स्पष्ट ।।

सृष्टी देते सहर्ष नयने, स्वागत करि याचे ।
गाउ लागले खगगण सगळे, स्तुतिस्तोत्र त्याचे ।।

वैभव बघण्या अरुण धावला, रथ घेउन अपुला ।
इंद्रदेवही कीर्ती पाहून, मनी खजिल झाला ।।

राष्ट्रीयत्वा अभय मिळूनी, हो रक्षण धर्मांचे ।
सिंहासन हे विक्रमशाली, प्रत्यंतर त्याचे ।।

सप्तसिंधुच्या स्वच्छ जलाचे, स्नान त्यास झाले ।
अराष्ट्रीय, अमंगल सगळे, त्या माजी विरले ।।

रामदास पाहतो सोहळा मनात गहिवरुनी ।
अभिषेकास्तव सहर्ष नयनी अश्रु दोन गळुनी ।।

# धन्य रामदास

दिनकर विश्वनाथ कुलकर्णी

आयुष्याची उभ्या लावुनी जगी तेलवात ।
'रामकृपा' सम्पादन केली 'धन्य रामदास' ।। ध्रु० ।।

जनाकारणे कष्ट साहिले ।
जनाकारणे त्रास सोसले ।
जनतेला या देव मानुनी झिजले दिनरात ।।१।।

पारतंत्र्य दारुण असताना ।
दिली सकळिकां स्वत्व-प्रेरणा ।
स्वर्ग उभविला स्वातंत्र्याचा शिवहस्ते येथ ।।२।।

बलोपासना नित्य घडावी ।
शक्तिसम्पदा जगि वाढावी ।
म्हणुनि स्थापिल्या बजरंगाच्या मूर्ती स्फूर्तिवंत ।।३।।

दासबोध सद्‌ग्रंथ निर्मिला ।
महाराष्ट्र हा सुजाण केला ।
प्रपंच-परमार्थाची सांगड घालुनिया नीट ।।४।।

स्फूर्तिप्रद तच्चरित्र ऐका ।
तेजस्वी जणू विद्युत्‌रेखा ।
आम्हा-तुम्हाला प्रेरक लाभे अक्षय तो स्रोत ।।५।।

महातपस्वी पावन योगी ।
वृत्ति विरागी स्वार्थत्यागी ।
कीर्ति चंदनापरी दरवळे कर जुळती तेथ ।।६।।

# पावन गोदातीर

अरविन्द पाटोळे

अभिमानाला जिथे लाभली संतत्वाची धार
सह्यगिरी तो पावन आणिक पावन गोदातीर ।। ध्रु० ।।

नाठाळांना देउन टोला दुबळ्यांना दे धीर
मनास आकळुन सज्जनतेला भक्तीचा दे सूर
विषयवासना मनी न येवो समर्थ सांगे सार ।। १ ।।

अन्यायाला भिऊन कोणी करू नका लाचारी
अहंकार पण घेऊन थोडा बनू नका अविचारी
धर्म रक्षण्या समर्थ सांगे खुशाल झेला वार ।। २ ।।

# राष्ट्रगुरू तू-महापुरुष तू

दिगंबर प्रल्हाद रेखी

अवनत देशा उन्नत करण्या घेशी अवतार,
कोटि मुखांनी दहा दिशांनी दिलीत ललकार,
नवतेजाचा चैतन्याचा घडला साक्षात्कार,
गभीर वाणी नव्या विचारां देई आकार ।। १ ।।

मेघनाद तो करी गर्जना दुमदुमला देश
शबल मनाला नवसामर्थ्ये नवाच ये आवेश,
श्रीरामाच्या शौर्यकथेच्या गायिले स गीता
राष्ट्रगुरू तू, महापुरुष तू, महान तू नेता ।। २ ।।

प्रपंचवादी जनां प्रेरणा महामंत्र देई,
'स्वधर्म माझा' स्वाभिमान हा आत्मतेज गाई,
देश-देव ही तुझी दैवते ज्वलंत तव भक्ती,
'दासबोध' हा दिव्य ग्रंथ तव दे आम्हा शक्ती ।। ३ ।।

## समर्थ-शक्ती

गोपाळ टाकळकर

समर्था, तुझी धन्य वाणी जगात ।
मिळे बोध मोठा सदा जीवनात ।।
अशी प्रेरणा अन्य कोठे मिळावी ?
तुझी रामसेवा जगाने स्मरावी ।। १ ।।

तुझ्या दासबोधे, जना बोध लाभे ।
त्रिखंडात साऱ्या तुझे नाम जागे ।।
तुवा निर्मिली राउळे मारुतीची ।
नदी वाहती ती जणू शूरतेची ।।२।।

तुझी रामप्रीती जनी सार्थ झाली ।
तुझे काव्य सारे जगा स्फूर्तिशाली ।
असा ब्रह्मचारी, असा भक्त नाही ।
तुझी रामसेवा जगादर्श होई ।।३।।

मिळे प्रेरणा मानवी जीवनात ।
तुझी 'अष्टके' रूप घेतात आर्त ।।
तुला रामदासा मुदे वंदितो मी ।
तुझ्या ग्रंथरूपी तुला पाहतो मी ।।४।।

# प्रशस्तिः

सौ. विद्या करमरकर

शुकासारिखे पूर्ण वैराग्य ज्याचे ।
वसिष्ठापरी ज्ञान योगेश्वराचे ।।
कवी वाल्मिकीसारिखा मान्य ऐसा ।
नमस्कार माझा तया रामदासा ।।

शुकर्षिर्यथा पूर्णवैराग्यधारी ।
वसिष्ठोपमो ज्ञानवान्यो हि योगी ।
गुरोर्वाल्मिकेरिव यस्य कवित्वम् ।
तं रामदासं नमामि समर्थम् ।।

## जय जगत्

द्वारकानाथ तांडेल

विश्वशांति निर्मिणे
उदात्त ध्येय ठेवुनी
समर्थ दास सांगती
जनास सर्व बोधुनी

सकल बंधु एक व्हा
एक ही वसुंधरा
अंतरी न विस्मरा
सत्य शिवा सुंदरा !

सर्वंही सुखी असा
मंत्र हा दिला तुम्ही
समाज-राज-कारणी
दीप लाविला तमी

# श्रीसमर्थगीत

नन्दकुमार दा. वाघमारे

ही शब्दफुले अर्पिता
अपुरी चरणी तुझ्या समर्था ।।१।।

शब्द जुळती परी कळेना अर्थ
समर्था तुझा मी एक असमर्थ ।
ताठ असुनी का झुकतो माथा ।।२।।

स्वर जुळती, सूर कळेना
संगती सगळे पण मार्ग मिळेना ।
अजीवन का हे जीवन आता ।।३।।

भाववीण हा सगळा अभाव
स्व-स्वाहाचा मनुजस्वभाव
पतित का हे पावन होता ।।४।।
पतिता कधि या पावन करिता ?

## आरती

सौ. नीता प्रभाकर पुल्लीवार

आरती घेई बापा, दासबोधजनका
घेई मनोबोधजनका ,
तारी संसारसागरी , सज्जनगडनायका ,
समर्था ! रघुराजसेवका ॥ध्रु०॥

अकरावा रुद्र त्रेती झाला हनुमान ,
त्याचि वैराग्य-रविला, कली रामदास नाम
काढी पळ मंडपातुन शब्द श्रवुनी 'सावधान'
आपण सावध होउनि विश्वा करी सावधान
धन्य ती माउली जिये उदरी जन्म घेई रामाचा सखा ॥१॥

पुरश्चरणे तीर्थयात्रे काये क्लेश दिले,
दीन भारता पाहुनी कष्टे द्रासहृदय द्रवले
शिवशाहीची पहाट फुलली पारतंत्र्य गेले
समर्थ असुनी शिवरायाला भवानिजननी करी ओपीले
मने मराठी मिळता, चुकला म्लेच्छांचा धोका ॥२॥

दासबोध हे नामच केवळ जगा बोध केला
विवेक अंतरी जागृत तरी मग प्रपंच नीट झाला,
प्रेमभक्तिने लुटा जगी या परम–अर्थाला
दीन दरिद्री कशास म्हणता हृदयी राम बसला
अमुच्या हृदयी राम जागवा अता अव्हेरू नका ॥३॥

तारी संसारसागरी सज्जनगडनायका ।
समर्थ सज्जनगडनायका ॥

३

## प्रतिनिधि

विश्वकवी रवींद्रनाथ ठाकूर

बसिया प्रभातकाले सेतारार दुर्गंभाले
        शिवाजि हेरिला एक दिन–
रामदास गुरु ताँर भिक्षा मागि द्वार द्वार
        फिरिछेन जेन अन्नहीन।
भाबिला ए की ए काण्ड ! गुरुजिर भिक्षाभाण्ड !
        घरे जाँर नाइ दैन्यलेश !
सब जाँर हस्तगत, राज्येश्वर पदानत,
        ताँरो नाइ बासनार शेष !

ए केवल दिने रात्रे जल ढेले फुटा पात्रे
        वृथा चेष्टा तृष्णा मिटाबारे।
कहिला, देखिते हबे कतखानि दिले तबे
        भिक्षा-झुलि भरे एकेबारे।
तखनि लेखनि आनि की लिखि दिला की जानि,
        बालाजिरे कहिला डाकाये
"गुरु जबे भिक्षा-आशे आसिबेन दुर्ग-पाशे
        एइ लिपि दियो ताँर पाये।"

गुरु चलेछेन गेये सम्मुखे चलेछे धेये
        कत पान्थ, कत अश्वरथ–
"हे भवेश, हे शंकर, सबारे दियेछ घर,
        आमारे दियेछ शुधु पथ।

अन्नपूर्णा मा आमार लयेछे विश्वेर भार
        सुखे आछे सर्व चराचर–
मोरे तुमि हे भिखारी, मार काछ हते काड़ि
        करेछ आपन अनुचर।"

समापन करि गान सारिया मध्यान्हस्नान
दुर्गद्वारे आसिला जखन
बालाजि नमियाँ तारे दाँड़ाइल एक धारे
पदमूले राखिया लिखन।
गुरु कौतूहल भरे तुलिया लइला करे,
पड़िया देखिला पत्रखानि–
"बन्दि ताँर पादपद्म शिवाजि सँपिछे अद्य
ताँरे निज राज्य–राजधानी"

परदिने रामदास गेलेन राजार पाश
कहिलेत, "पुत्र, कहो शुनि,
राज्य यदि मोरे देबे की काजे लागिबे एबे—
कोन् गुण आछे तव गुणी।"
"तोमारि दासत्वे प्राण आनन्दे करिब दान"
शिवाजि कहिला नमि ताँरे।
गुरु कहे, "एइ झुलि लहो तबे स्कन्धे तुलि,
चलो आजि भिक्षा करिबारे।

शिवाजि गुरुर साथे भिक्षापात्र लये हाते
फिरिलेन पुरद्वारे–द्वारे।
नृपे हेरि छेले मेये भये घरे जाय धेये,
डेके आने पितारे मातारे।
अतुल ऐश्वर्ये रत ताँर भिखारीर व्रत;
ए जे देखि जले भासे शिला।
भिक्षा देय लज्जाभरे, हस्त काँपे थरोथरे;
भाबे इहा महतेर लीला।

दुर्गे द्विप्रहर बाजे, क्षान्त दिया कर्म-काजे
बिश्राम करिछे पुर बासी।
एकतारे दिये तान रामदास गाहे गान
आनन्दे नयनजल भासि,

"ओहे त्रिभुवनपति, बुझि ना तोमार मति,
किछुइ अभाव तव नाहि--
हृदये हृदये तबु भिक्षा मागि फिर प्रभु,
सबार सर्वस्व-धन चाहि।"

अबशेषे दिबसान्ते नगरेर एक प्रान्ते
नदीकूले सन्ध्यास्नान सारि
भिक्षा-अन्न राँधि सुखे गुरु किछु दिला मुखे,
प्रसाद पाइल शिष्य ताँरि।
राजा तबे कहे हासि, "नृपतिर गर्ब नाशि
करियाछ पथेर भिक्षुक;
प्रस्तुत रयेछे दास–तारो किबा अभिलाष,
गुरु काछे लव गुरु दुख।"

गुरु कहे, "तबे शोन् करिलि कठिन पण,
अनुरूप निते हबे भार–
एइ आमि दिनु कये मोर नामे मोर हये
राज्य तुमि लहो पुनर्बार।
तोमारे करिल विधि भिक्षुकेर प्रतिनिधि,
राज्येश्वर दीन उदासीन;
पालिबे जे राजधर्म जेनो ताहा मोर कर्म,
राज्य लये रबे राज्यहीन।

वत्स, तबे एइ लहो मोर आशीर्वाद-सह
आमार गेरुवा गात्रबास;
बैरागीर उत्तरीय पताका करिया न्यियो"
कहिलेन गुरु रामदास।
नृपशिष्य नतशिरे बसि रहे नदीतीरे,
चिन्ताराशि घनाय ललाटे।
थामिल राखाल–वेणु गोठे फिरे गेल धेनु,
परपारे सूर्य गेल पाटे

पुरबीते धरि तान एकमने रचि गान
गाहिते लागिल रामदास,
" आमारे राजार साजे बसाये संसार-माझे
के तुमि आडाले कर बास ।
हे राजा रेखेछि आनि तोमारि पादुकाखानि,
आमि थाकि पादपीठतले ।
सन्ध्या हये एल ओई, आर कत बसे रइ
तब राज्ये तुमि एस चले ।"

६ कार्तिक १३०४ (१७१९)
(इ. स. १८९७)

कथा ओ काहिनी
(पृष्ठ : १६–२०)

ॲक्वर्थ साहेबांनीं कांहीं मराठी संग्राम-गीतांचा जो इंग्रजी अनुवादग्रंथ (Ballads of the Marathas) प्रकाशित केला आहे त्याच्या प्रस्तावनेंत वर्णिलेली घटना येथें घेण्यांत आली आहे. शिवाजीमहाराजांचा गेरू रंगाचा ध्वज 'भगवा झेंडा' या नांवानें प्रसिद्ध आहे.

एके दिवशीं प्रभातकाळीं सातार्‍याच्या किल्ल्याच्या सज्जांत बसून शिवाजी महाराजांनीं असें पाहिलें कीं, आपले गुरु रामदास जणू अन्नहीन असल्याप्रमाणें दारोदार भिक्षा मागत फिरत आहेत. त्यांच्या मनांत विचार आला, ही किती विचित्र गोष्ट आहे ! ज्यांच्या घरी लेशमात्रहि दैन्य नाहीं त्या गुरुजींच्या हातीं भिक्षापात्र ? ज्यांच्या मुठींत सर्व कांहीं आहे, राज्येश्वरानें ज्यांच्या पायांवर लोटांगण घातलें आहे, त्यांच्याहि वासनेला अंत नसावा ना ?

हें केवळ फुटक्या पात्रांत अहोरात्र पाणी ओतून तृष्णा शमविण्याचा निरर्थक प्रयत्न करण्यासारखें आहे. ते म्हणाले, किती दिल्यानें भिक्षाझोळी पुरेपूर भरेल तें पाहिलें पाहिजे. त्याच वेळीं लेखणी आणून त्यांनीं काय लिहीलें कोण जाणे ! बाळाजीला बोलावून ते म्हणाले, "गुरुजी जेव्हां भिक्षेच्या आशेनें गडाजवळ येतील तेव्हां हें पत्र त्यांच्या चरणीं अर्पण करा."

गुरुजी गात चालले आहेत. समोर कितीतरी पांथ, कितीतरी अश्वस्थ धांवत चालले आहेत.—"हे भवेशा, हे शंकरा, तू सर्वांना घर दिलें आहेस. पण मला मात्र केवळ रस्ताच दिला आहेस. अन्नपूर्णा माझी माता. तिनें विश्वाचा भार घेतला आहे. सारे चराचर सुखांत आहे.——पण हे भिकार्‍या, तूं मला मातेजवळून दूर काढून आपला अनुचर बनविलें आहेस."

गाणें संपवून मध्यान्ह-स्नान उरकून रामदासस्वामी जेव्हां दुर्गद्वारीं आले, तेव्हां बाळाजीनें त्यांना नमस्कार करून त्यांच्या पायांवर तें लिखाण ठेवलें व तो एका बाजूला उभा राहिला. गुरुजींनीं कुतूहलानें तें पत्र उचलून हातांत घेतलें व वाचून पाहिलें. त्या पत्रांत लिहिलें होतें, 'मी शिवाजी आपल्या चरणकमलांना वंदन करून राजधानीसह माझें राज्य आपणाला आज अर्पण करीत आहें.'

दुसर्‍या दिवशी रामदास शिवाजी राजाकडे गेले आणि म्हणाले, "बेटा, तूं जर आपलें राज्य मला दिलेंस तर तूं आतां काय काम करणार सांग पाहूं ?" शिवाजीमहाराज त्यांना नमस्कार करून म्हणाले, "तुमच्याच सेवेमध्यें मी माझें जीवन आनंदानें समर्पित करतों." त्यावर गुरुजी म्हणाले, "तर मग ही झोळी खांद्यावर घे आणि आज भिक्षा मागण्यास चल."



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2744
दा. क्र. 23454

शिवाजी महाराज आपल्या गुरूबरोबर हातीं भिक्षापात्र घेऊन शहराच्या दारोदारीं फिरले. राजाला पाहून मुलें-बाळें भीतीनें घरांत धांवत जात आणि आपल्या आईबापांना बोलावून आणीत. ज्यांनीं अतुल ऐश्वर्यात लोळावयाचें त्यांनीं भिकाऱ्याचें व्रत घेतलेलें पाहून जणूं पाण्यावर दगड तरंगत असल्यासारखें लोकांना वाटलें. ते लज्जित होऊन भिक्षा घालीत होते. त्यांचे हात थरथर कांपत होते. त्यांच्या मनांत विचार येत होता, ही मोठ्यांची लीला !

गडावर दुसऱ्या प्रहराचे टोल पडले. कामकाज आवरून पुरवासी विश्रांति घेत आहेत. रामदास डोळ्यांतून आनंदाश्रू ढाळीत एकतारीवर गाणें गात आहेत: "हे त्रिभुवनपति, तुझें मन मला कळत नाहीं. तुला कसलीच उणीव नाहीं. तरी सुद्धां हे प्रभु, तूं सर्वांच्या सर्वस्व-धनाची इच्छा बाळगून हृदया-हृदयांत भिक्षा मागत फिरतोस."

अखेर दिवस मावळल्यानंतर शहराच्या एका कडेला नदीतीरीं संध्यास्नान आटोपून भिक्षान्न शिजवून गुरुजींनीं सुखानें दोन घास खाल्ले. त्यांच्या शिष्यानेंही प्रसाद घेतला. नंतर हंसून शिवाजी महाराज म्हणाले, " राजाचा गर्व नाहीसा करून त्याला तुम्हीं रस्त्यावरला भिकारी बनविलें. हा दास तुमच्या सेवेस तयार आहे. त्याचीहि हीच अभिलाषा आहे कीं, गुरूजवळून महान् दुःखसाधना घ्यावी."

गुरुजी म्हणाले, "तर मग ऐक. तूं फार अवघड प्रतिज्ञा केली आहेस. ती योग्य प्रकारें तुला पार पाडावी लागेल. माझें असें सांगणें आहे कीं, माझ्या नांवानें, माझ्या वतीनें हें राज्य तूं पुन्हां परत घे. तुला विधात्यानें भिक्षुकाचा प्रतिनिधि, वैभवशून्य अनासक्त राज्येश्वर बनविलें आहे. तूं जो राजधर्म पाळशील तें माझेंच कार्य आहे, असें समज. राज्य घेऊन तूं राज्यहीनाप्रमाणें रहा.

"वत्सा, तर मग हें घे माझ्या आशीर्वादासह माझें भगवें वस्त्र. या वैराग्याच्या उपरण्याची तूं आपली पताका बनव." गुरु रामदास म्हणाले. तो नृपशिष्य नतमस्तक होऊन नदीतीरीं बसून राहिला. त्याच्या ललाटीं चिन्ताराशि दाटून आली. गुराख्याची बांसरी थांबली. गायी गोठ्यांत परत गेल्या. पैलतीरीं सूर्य अस्ताचलीं गेला.

पूर्वी रागाच्या स्वरांत गाणें रचून रामदास (शिवाजीच्या भूमिकेंतून) एकाग्र मनानें गाऊं लागले. "मला राजाच्या वेषांत, संसारामध्यें गुंतवून स्वतः पडद्यामागें राहाणारा तूं कोण आहेस? हे देवराया, तुझ्याच पादुका आणून मीं ठेविल्या आहेत. मी तुझ्या पादपीठाखालीं राहीन. ही पाहा संध्या झाली. मी आणखी किती वेळ बसून राहूं ? तुझ्या राज्यांत तूं ये ना !"

( श्रीपाद जोशी : 'रवींद्रनाथ आणि महाराष्ट्र': पृ.११-१८. )



REFBK-0023557
REFBK-0023557